# स्वारस्याची अभिरुची

# जाहिर सुचना

जावक क्र. वविशम/वैआवि/९३८/२०२३ दि. ०४/०८/२०२३

सर्व इच्छुक व्यक्ती/संस्था/विकासक/ठेकेदार यांना कळविण्यात येत आहे की, महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत नव्याने चालू करणेत येणाऱ्या रुग्णालयाचे आंतर व बाहय संरचना डिझाइन करणेसाठी स्वारस्याची अभिरुची (EOI) खालील अटी-शर्तीवर दि. १७/०८/२०२३ रोजी ५.०० वा पर्यंत मागविण्यात येत आहे.

**कामाची व्याप्ती:-**

१. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी नवीन रुग्णालय बांधणे अंतर्गत (अपघात विभाग, ओ.पी.डी विभाग, आय.पी.डी विभाग, शस्त्रक्रिया विभाग, औषध विभाग, सोनोग्राफी व एक्स-रे रुम, प्रयोगशाळा, प्रशासन विभाग, ऑक्सिजन प्लॉट, सेवा क्षेत्र जसे आर.ओ, वॉशिंग/ड्राईग क्षेत्र, इ.टी.पी/एस.टी.पी प्लॉट इ.) व्यवस्थाचे डिझाईन/आरेखन करुन देणे बंधनकारक राहील.

२. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी जुन्या/अस्तिवातील रुग्णालयात (अपघात विभाग, ओ.पी.डी विभाग, आय.पी.डी विभाग, शस्त्रक्रिया विभाग, औषध विभाग, सोनोग्राफी व एक्स-रे रुम, प्रयोगशाळा, प्रशासन विभाग, ऑक्सिजन प्लॉट, सेवा क्षेत्र जसे आर.ओ, वॉशिंग/ड्राईग क्षेत्र, इ.टी.पी/एस.टी.पी प्लॉट इ.) व्यवस्थाचे डिझाईन/आरेखन करुन देणे बंधनकारक राहील.

**पूर्व पात्रता:-**

१. संबंधित संस्था/व्यक्ती हे व संस्थेतील तज्ञ कर्मचारी (बी.ई/एम.ई सिव्हिल, बी. आर्किटेक्चर/एम. आर्किटेक्चर व त्या पुढील शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक राहील.

२. वास्तुविशारद/नियोजनकार संस्था असल्यास त्यांचेकडे कार्यरत अभियंते, वास्तुविशारदक/आरेखनकार यांची यादी देणे बंधनकारक राहील.

३. संबंधित संस्था/व्यक्ती यांनी कामाची व्यार्प्ती यात नमूद अंतर्गत व बाहय संरचना डिझाईन या क्षेत्रात किमान ३ वर्षे अनुभव तसेच शासकिय/खाजगी रुग्णालयाचे किमान ५० बेड आय.पी.डी, ओ.पी.डी व अन्य आंतररुग्ण विभागांसह निर्माण केल्याचा अनुभव दाखला देणे बंधनकारक राहील.

४. संयुक्त संस्था असल्यास रुग्णालय उभारणी व रुग्णालयातील ओ.पी.डी व अन्य आंतररुग्ण आरेखन केलेल्याचे किमान ३ वर्षाचा अनुभव दाखला देणे बंधनकारक राहील.

५. खाजगी संस्थांनी त्यांचे आय.टी.आर व जी.एस.टी शासनास भरणा केल्याचे तसेच अन्य लागू शासकीय नोंदणी प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६. सदर काम करताना कोणताही अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास संबंधीत संस्था/व्यक्तीची जबाबदार राहील.

७. सदर कामकाज उप-आयुक्त (वैद्यकिय) व प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करणे आवश्यक राहील.

८. सदर स्वारस्याची अभिरुची दिनांक १७/०८/२०२३ रोजी सायं ५.०० वा. पर्यंत उपायुक्त (वैद्यकिय) वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे सिलबंद लखोटयात सादर करणे आवश्यक राहील.

(डॉ. विजयकुमार द्वासे)
उपायुक्त (वैद्यकिय)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका जि. पालघर